| | |
|---|---|
| | **विशेष कक्ष स्थायी समितीचे गठण व कामकाजपध्दती**<br><br>विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या परिपत्रकानुसार केंद्र सरकार व यु.जी.सी. व राज्य सरकार यांचे मार्फत मागासवर्गीयांसाठी दिल्या जाणा-या सवलती आदेश व योजना यांची परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने विद्यापीठात व विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी व त्यांना नियमानुसार असलेल्या विशेष सवलती योग्य प्रकारे उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ दंडक क्र. १५८ (२.१) मधील तरतुदीनुसार तीन वर्षासाठी विशेष कक्ष स्थायी समितीचे गठण केले जाते. |
| **शिवाजी विद्यापीठ दंडक क्र. १५८ (२.१)**<br><br>**विद्यापीठासाठी विशेष कक्ष स्थायी समितीची रचना** | विद्यापीठासाठी शिवाजी विद्यापीठ दंडक क्र. १५८ (२.१) मधील तरतुदीनुसार तीन वर्षासाठी विशेष कक्ष स्थायी समितीचे गठण केले जाते.<br>The Special Cell Standing Committee in the University shall consist of:<br>(see table below)<br>The members at Serial Nos. ii to vi are to be nominated by the Management Council. Tenure : The tenure of members at Sr. No. ii to vi shall be three years. |

| | | |
|---|---|---|
| i. | The Vice-Chancellor | Hon'ble Prof. Dr. Mrunalini Fadnavis |
| ii. | 2-3 Professors | 1) Prof. V. B. Ghute<br>2) Prof. Dr. V. B. Patil |
| iii. | 3-5 Principals | 1) Prin. Dr. A. L. Deshmukh<br>2) Prin. Dr. C. B. Kolekar<br>3) Prin. Dr. Smt. K. A. Pande<br>4) Prin. Dr. S. K. Pawar<br>5) Prin. Dr. S. S. Ganpur |
| iv. | 1-2 Readers | 1) Dr. R. B. Bhosale<br>2) Dr. R. N. Mulik |
| v. | 1-2 Lecturers | 1) Dr. Changdev Kamble<br>2) Dr. Suhas Dahitnekar (Kamble) |
| vi. | 2 women representative from teaching and non-teaching category | 1) Dr. Smt. Anjana Lawand<br>2) Smt. Archana Salunkhe |
| vii. | A representative of the State. Govt. | ---vacant--- |
| viii. | The Deputy Registrar (Spl. Cell) | Dr. S. N. Shinde |

## विशेष कक्ष स्थायी समितीची कामकाज पध्दती

१. विद्यापीठ तसेच महाविद्यालयातील संबंधित आस्थापनांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे तयार केलेले सरळसेवा भरती तसेच बढती बाबतचे बिंदुनामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणी करणे व त्यानुसार भरतीमधील मागासवर्गीय प्रवर्गांचा अनुशेष निश्चित करणे.

२. संलग्नित महाविद्यालये तसेच शैक्षणिक संस्था यांच्याकडून पाठविण्यात येणा-या शिक्षक पदांच्या भरतीसाठीच्या जाहिरात प्रस्तावांची छाननी करुन परिपूर्ण प्रस्तावांना मान्यता देणे व त्रुटीत प्रस्तावाबाबत महाविद्यालयांना अवगत करुन, त्रुटीपूर्ततेअंती मंजूरी देणे.

३. महाविद्यालयाकडील विद्यार्थी प्रवेश व वसतिगृह प्रवेशातील आरक्षणाची माहिती संकलित करुन माहितीची सांख्यिकी डाटा करणे व संकलित माहिती शासनाच्या मागणीनुसार शासनास सादर करणे.

४. महाविद्यालये व शैक्षणिक संस्था यांच्याकडील कार्यरत शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांची भरती/बढती व अनुशेषाची माहिती संकलित करुन शासनास सादर करणे.

५. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मंजूरी होऊन आलेले फेलोशिप अदा करणे, नेट परीक्षा मार्गदर्शन वर्ग स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन वर्ग या योजनांचा परिणामकारक अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन करणे.

६. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात येणा-या शिष्यवृत्तीचे पर्यवेक्षण करणे.

७. महाराष्ट्र शासनाकडून, विद्यापीठ अनुदान आयोग आणि इतरांकडून मागासवर्गीयांसाठी जाहीर झालेल्या विविध योजनांची सुरुवात करणे.

८. महाविद्यालयामधील/विद्यापीठामधील विद्यार्थी प्रवेश, कर्मचारी सेवाप्रवेश, कर्मचारी पदोन्नती व इतर बाबींमधील मागासवर्गीयांच्या प्रतिनिधित्वाबद्दल उचित कार्यवाही करणे.

९. मागासवर्गीयांबद्दल विविध शासन निर्णय, परिपत्रके इ. महाविद्यालयातील/विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणणे.

१०. विशेष कक्ष स्थायी समितीमध्ये मागासवर्गीयांचे पुरेसे प्रतिनिधित्व राहिल याची काळजी घेणे.

११. विशेष कक्ष स्थायी समितीची वर्षातून कमीत - कमी दोनदा म्हणजेच १५ मार्च व १५ सप्टेंबर या दरम्यान बैठका घेणे.

१२. विशेष कक्ष स्थायी समितीचे बैठकीचे कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेस विचारार्थ सादर करणे.

शिवाजी विद्यापीठ दंडक क्र. १५८ नुसार विशेष कक्ष स्थायी समिती :- संलग्नित महाविद्यालये व शैक्षणिक संस्था शिक्षक पदांच्या जाहिरातींना मान्यता, विद्यार्थी प्रवेश आरक्षणाची माहिती, शिष्यवृत्ती वाटप व मागासवर्गीयांच्या तक्रारीचे निराकरण करणेसाठी विशेष कक्ष स्थायी समितीची नियुक्ती केलेली असते.